नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १९४ Issue - 194 | वार रविवार दि. १ डिसेंबर २०२४ Blow- Sunday Date 1 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### दिल्लीत अरविंद केजरीवालांवर हल्ला!

नवी दिल्ली : दिल्लीचे माजी मुख्यमंत्री व आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांच्यावर हल्ला झाल्याची घटना पाहायला मिळाली आहे. पोलीस केजरीवालांना सुरक्षा पुरवण्यात अपयशी ठरले आहेत. दिल्लीतल्या मालवीय नगर परिसरात केजरीवाल यांची पदयात्रा चालू होती. त्याचवेळी एका इसमाने सुरक्षा व्यवस्था भेदून केजरीवालांच्या जवळ जात त्यांच्या अंगावर एका द्रव पदार्थाचा शिडकावला केला. दरम्यान, आम आदमी पार्टीने म्हटलं आहे की त्या इसमाने केजरीवाल यांच्या अंगावर स्पिरिट (ज्वलनशील पदार्थ) फेकलं, त्याच्या हातात काडीपेटी देखील होती. अरविंद केजरीवाल यांना जिवंत जाळण्याचा त्या इसमाचा प्रयत्न होता. आम आदमी पार्टीचे प्रवक्ते व मंत्री सौरभ भारद्वाज यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबतची माहिती दिली आहे. दरम्यान, केजरीवालांवरील हल्ल्याचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. दरम्यान, पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं असून त्याची चौकशी सुरू केली आहे. या हल्ल्यानंतर सौरभ भरद्वाज यांनी पत्रकार परिषद घेतली.

# महाराष्ट्रात ५ डिसेंबरला नव्या सरकारचा शपथविधी सोहळा होणार

## राज्यात सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा; भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला असून येत्या ५ डिसेंबर रोजी शपथविधी सोहळा पार पडणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे. याबाबत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली.

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. २३ नोव्हेंबर रोजी एकत्रित निकाल जाहीर झाले. २८८ सदस्य असलेल्या विधानसभेत २३५ जागा महायुतीच्या वाट्याला गेल्या. त्यामुळे महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं. परंतु, निर्विवाद बहुमत मिळाल्यानंतरही महायुतीकडून सत्ता स्थापनेकरता उशीर करण्यात आला. मुख्यमंत्री आणि इतर मंत्रिपदाकरता जोरदार रस्सीखेच अद्यापही सुरू आहे. त्यामुळे राज्यात नवं सरकार कधी स्थापन होणार असा प्रश्न सातत्याने विचारला गेला. दरम्यान, आता भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक्स पोस्ट करून शपथविधीबाबत महत्त्वाची माहिती दिली. ५ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता शपथविधी सोहळा होणार आहे. मुंबईतील आझाद मैदानात हा सोहळा रंगणार असून यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीही येणार आहेत. राज्यात मंत्र्यांची संख्या आणि खातेवाटपावरून अद्याप तिन्ही पक्षांमध्ये सहमती झालेली नाही. महायुती सरकारच्या रचनेबाबत अमित शहा यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी गुरुवारी रात्री सुमारे तीन तास बैठक पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस हेच असतील, हे स्पष्ट करण्यात आले. पण काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मागण्यांमुळे गाडी अडल्याचे सांगण्यात येते. एवढे प्रचंड बहुमत मिळूनही विधिमंडळ नेता निवडीसाठी आमदारांची साधी बैठकही अद्याप होऊ शकलेली नाही. भाजपच्या आमदारांमध्येही ही अस्वस्थता जाणवते.

### एक मुख्यमंत्री अन् दोन उपमुख्यमंत्री

**दरम्यान, आज माध्यमांशी संवाद साधताना राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महत्त्वाची माहिती दिली. भाजपाचा मुख्यमंत्री होणार असून महायुतीतील इतर दोन प्रमुख घटकपक्षातील प्रत्येकी एक-एक असे दोन उपमुख्यमंत्री राज्याला लाभणार आहेत, अशी माहिती अजित पवारांनी दिली.**



# बांगलादेशमधील हिंदूंसाठी आरएसएस मैदानात; मोदी सरकारकडे केली मोठी मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोलकाता : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने शनिवारी (३० नोव्हेंबर) एक निवदेन जारी केलं आहे. संघाने बांगलादेशात हिंदू समुदायावर होत असलेल्या अत्याचारांचा कठोर शब्दांत निषेध नोंदवला आहे. संघाचे सहकार्यवाहक दत्तात्रेय होसबाळे यांनी या निवेदनात म्हटलं आहे की बांगलादेशात हिंदू व इतर अल्पसंख्याक समुदायातील लोकांवर मुस्लीम कट्टरपंथीयांकडून होत असलेले हल्ले, हत्या, लूटमार, दरोडे, जाळपोळीच्या घटना, महिलांवरील अत्याचार, अल्पसंख्याक समुदायातील मुलं व महिलांवरील अमानवीय अत्याचार खूप चिंताजनक आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या घटनांचा निषेध नोंदवतो. बांगलादेशमधील सध्याचं सरकार व इतर संरक्षण यंत्रणा, पोलीस व सैन्य या सगळ्या घटनांकडे कानाडोळा करत आहेत.

होसबाळे यांनी म्हटलं आहे की बांगलादेशमधील संरक्षण यंत्रणा तिथल्या अलप्संख्याकांना वाचवण्याऐवजी मूकदर्शक बनल्या आहेत. त्याच वेळी बांगलादेशमधील हिंदूंनी त्यांच्यावरील अन्याय, अत्याचारांनंतर आवाज उठवण्याचा प्रयत्न केला. मात्र तिथल्या सरकारने त्यांचा आवाज दाबून ठेवला आहे. तिथल्या हिंदूंनी आंदोलन करण्याचा प्रयत्न केला मात्र बांगलादेशी सरकारने हिंदूंची आंदोलनं चिरडली. प्रसंगी त्यांच्यावर अन्याय व अत्याचार करण्यास सुरुवात केली आहे. अशातच तिथल्या हिंदूंच्या शांततेत चालू असलेल्या आंदोलनाचं नेतृत्व करणारे इस्कॉनचे माजे सदस्य व हिंदू संन्यासी चिन्मय कृष्ण दास यांना बांगलादेशी सरकारने तुरुंगात डांबलं आहे.



संघाने बांगलादेशी सरकारकडे मागणी केली आहे की त्यांनी तिथल्या हिंदूवरील अत्याचार थांबवले पाहिजेत. तसेच चिन्मय दास यांना तुरुंगातून मुक्त करावं. भारत सरकारने देखील याची दखल घ्यावी.

चिन्मय कृष्णा दास ब्रह्मचारी या हिंदू नेत्याला सोमवारी झालेली अटक आणि त्यापाठोपाठचा तुरुंगवास यामुळे भारताकडून अधिकृतरीत्या चिंता व्यक्त करण्यात आली असतानाच, चिन्मय दास यांच्या कारवायांशी इस्कॉनचा काहीही संबंध नाही असा खुलासा 'इस्कॉन बांगलादेश'चे सरचिटणीस चारू चंद्र दास ब्रह्मचारी यांनी केलं आहे. इस्कॉन बांगलादेश हिंदूंना एकत्र करत असल्याबद्दल आणि जबरदस्तीच्या धर्मांतरांना विरोध केल्यामुळे आम्हाला लक्ष्य केले जात असल्याचा आरोप चारू दास यांनी 'पीटीआय'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये केला आहे. आमच्या कामामुळे बांगलादेशातील मूलतत्त्ववादी आमची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न करत असल्याचे दास म्हणाले.

# भारतीय तिरंग्याचा अवमान; कोलकातामधील रुग्णालयाने घेतला मोठा निर्णय, यापुढे बांगलादेशी रुग्णांवर उपचार करणार नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोलकाता : बांगलादेशमध्ये सत्तांतर झाल्यापासून हिंदू अल्पसंख्याकांवर अत्याचार होत आहेत. हिंदूबहुल असलेल्या भागांत हल्ले होणे, प्रार्थना स्थळांची विटंबना आणि धर्मगुरूंना अटक होण्याचे प्रकार आतापर्यंत घडले आहेत. मात्र आता बांगलादेशमध्ये भारतीय राष्ट्रध्वजाचा ठिकठिकाणी अवमान केला जात आहे. ही बातमी समोर आल्यानंतर पश्चिम बंगालच्या कोलकाता येथील जे.एन. रॉय रुग्णालयाने मोठा निर्णय घेतला आहे. बांगलादेशमधून येणाऱ्या रुग्णांवर यापुढे रुग्णालयात उपचार केले जाणार नाहीत, असे रुग्णालयाच्या संचालकांनी जाहीर केले आहे.



जे. एन. रॉय रुग्णालयाचे संचालक सुभ्रांषू भक्त म्हणाले, राष्ट्र सर्वात महत्त्वाचे आहे. राष्ट्रापेक्षा कुणीही मोठा नाही. वैद्यकीय सेवा देणे हा परोपकारी व्यवसाय असला तरी देशाची प्रतिष्ठा ही त्याउपर आहे. आम्ही जो निर्णय घेतला, तसाच निर्णय इतर रुग्णालयांनीही घ्यावा. भारतीय राष्ट्रध्वजाची विटंबना केल्याच्या निषेधार्थ रुग्णालयाने बांगलादेशमधील रुग्णांना सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा नाकारण्याचा निर्णय घेतला आहे.

आठवड्याच्या सुरुवातीला बांगलादेशात देशद्रोहाच्या आरोपाखाली हिंदू धर्मगुरू चिन्मय कृष्ण दास यांना अटक केली गेली. याप्रकरणी बांगलादेशने निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने सुनावणी घ्यावी, असे भारताकडून सांगण्यात आले. त्यानंतर बांगलादेशमध्ये ठिकठिकाणी भारतीय राष्ट्रध्वजाचा अवमान सुरू झाला. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनीही बांगलादेशमध्ये हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांवर होणाऱ्या अत्याचारावरून चिंता व्यक्त केली आहे.

प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ इंद्रनील साहा म्हणाले की, मी बांगलादेशी रुग्णांवर उपचार करणे बंद केले आहे. गुरुवारी रात्री साहा यांनी आपल्या सोशल मीडिया हँडलवर बांगलादेशमध्ये राष्ट्रध्वजाचा विटंबना झाल्याचा फोटो शेअर केला होता. ते म्हणाले, बीयूइटी विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराजवळ भारताचा राष्ट्रध्वज पडून आहे. त्यामुळेच आता मी बांगलादेशी रुग्णांना उपचार देणे बंद करत आहे. राष्ट्र सर्वप्रथम, त्यानंतर माझे उत्पन्न. मला वाटते, इतर डॉक्टरही या भूमिकेला समर्थन देतील.

पश्चिम बंगालच्या विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि भाजपा नेते सुवेंदू अधिकारी यांनीही शुक्रवारी अशाच प्रकारची मागणी केली होती. ते म्हणाले, इंद्रनील साहा यांच्या भूमिकेचे मी स्वागत करतो. तसेच भारतातील सर्वच वैद्यकीय कर्मचाऱ्यांना, व्यावसायिकांना आणि राष्ट्रप्रेमींना आवाहन करतो की, त्यांनी बांगलादेशवर संपूर्णपणे बहिष्कार टाकावा.

**चेन्नईसह अनेक ठिकाणी रेड अलर्ट** | **चक्रीवादळामुळे थंडीचा पारा घटला**

# तामिळनाडू-पद्दुचेरीत धडकणार चक्रीवादळ फेंगल; वाऱ्याचा वेग ९० किमी प्रतितास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या फेंगल या चक्रीवादळामुळे उत्तर तमिळनाडूमधील चेन्नई आणि इतर अनेक जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. यादरम्यान चक्रीवादळाचा जमिनीकडे येण्याचा वेग काही प्रमाणात कमी झाला आहे. संध्याकाळपर्यंत हे चक्रीवादळ किनारपट्टी भागात धडकेल असा अंदाज वर्तवला जात होता. पण सध्या हे चक्रीवादळ रात्रीपर्यंत किनारपट्टीजवळ पोहचेल असे सांगितले जात आहे.

चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर तामिळनाडू आणि पद्दुचेरीमध्ये मुसळधार पाऊस आणि जोराच्या वाऱ्यामुळे जन जीवन विस्कळीत होण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. दरम्यान हवामान विभागाच्या अंदाजानुसार हे चक्रीवादळ रात्रीच्या सुमारास पुद्दुचेरीजवळ धडकेल आणि यावेळी वाऱ्याचा वेग ९० किमी प्रतितास असेल असे सांगण्यात आले आहे. चक्रीवादळाच्या हालचालीस होत असलेला उशीर, कमी झालेला वेग आणि ते गेल्या काही दिवसांपासून बंगालच्या उपसागरावर घोंघावत असल्याने तामिळनाडू आणि पद्दुचेरीमध्ये प्रचंड पाऊस होत असल्याचे सांगितले जात आहे.

शनिवारी सकाळी चेन्नई आणि परिसरातील जिल्ह्यांमध्ये तुफान पावसाची नोंद झाली आणि याचा परिणाम म्हणून सखल भागात पाणी भरल्याचे पाहायला मिळाले. हवामान केंद्रांवर गोळा झालेल्या पावसाच्या आकडेवारीनुसार उत्तर चेन्नईमधील काथिवाक्कममध्ये सर्वाधिक १२ सेमी पावसाची नोंद झाली, तर शहराच्या इतर भागांमध्ये सरासरी ६ ते ९ सेमी पावसाची नोंद झाली आहे.

भारतीय हवामानशास्त्र विभागानुसार फेंगल चक्रीवादळ हे शनिवारी सकाळी साडे आठ वाजता चेन्नईच्या अंदाजे ११० किमी अग्नेय आणि पद्दुचेरीच्या १२० किमी पूर्व-इशान्येस होते. दरम्यान दक्षिणेकडे सरकत असलेले हे चक्रीवादळ आज रात्री रात्री कराईकल आणि ममल्लापुरमच्या दरम्यानचा समुद्र किनारा ओलांडेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.



जमीनीकडे येण्यास लागलेल्या उशीरामुळे सातत्याने मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. चक्रीवादळ जमीनीवर धडकल्यानंतर देखील पाऊस सुरूच राहाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यादरम्यान चेन्नई, तिरुवल्लूर, चेंगलपट्टू, कांचीपुरम, विल्लुपुरम, कल्लाकुरिची आणि कुड्डालोर यासह पुद्दुचेरीसाठी देखील रेड अलर्ट कायम आहे. या भागात मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच तमिळानाडूतील अंतर्गत भागांमधील रानीपेट, तिरुवन्नमलाई आणि नागापट्टिनमसह या जिल्ह्यांसाठीही हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे, येथेदेखील तुलनेने कमी पण जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. चक्रवादळाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे. २,००० हून अधिक मदत शिबिरे उघडण्यात आली आहेत. तसेच सरकारी यंत्रणांच्या सल्ल्यानंतर ४,१०० हून अधिक मासेमारी नौका किनाऱ्यावर परतल्या आहेत. नागापट्टिनम आणि तिरुवरूर जिल्ह्यांमध्ये, असुरक्षित भागातील सुमारे ५०० लोकांना आश्रयस्थळी हलवण्यात आले आहे. दरम्यान चक्रीवादळामुळे परिसरातील वाहतूक आणि सार्वजनिक वाहतूक सेवा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाल्या आहेत. चेन्नई विमानतळावर दुपारपासून ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत सर्व उड्डाणे रद्द केली आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानव कल्याणाचे शिल्पकार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

देशातील विषमता, द्वेष, भेदभाव मातीत गाडून माणसाला माणूस म्हणून समान हक्क अधिकार देऊन प्रत्येक माणसाला सारखेच महत्त्व निर्माण करण्याचे काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रत्येक कार्यावर, त्यांनी मांडलेल्या विचारावर आपण संशोधन केले तर खुप गहन विषय तर आहेतच परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यात आणि विचारात एकुणच मानवाचे कल्याण असल्याचे सिद्ध होते. हजारो वर्षांपासून सर्वच व्यवस्था स्वतः कडे ठेवून इतरांचे हक्क अधिकार, मानवी स्वातंत्र्य व विकासाचे द्वार बंद करून स्व श्रेष्टत्व जोपासणाऱ्या मनोविकृत लोकांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य न पटणारे आहे. कारण हजारो वर्षांपासून चालत आलेली व्यवस्था उध्वस्त करून सर्वसामान्य लोकांना समान संधी व देशाच्या संपतीत समान वाटा निर्माण करून देणारे डॉ एकमेव महामानव होत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे ज्यांची व्यवस्था उध्वस्त झाली ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विरोध करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चुकिची मांडणी करण्यात कणभरही मागे सरकत नाही. प्रत्येक वेळी मनुवादी लोकांकडून व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेणाऱ्या लोकांकडून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची मांडणी एकतर्फी व मर्यादित करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समजून घेतल्या गेलेच नाही. देशामध्ये बहुसंख्य असलेल्या ओबिसी वर्गाने अपवाद वगळता डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे कार्य याकडे पाठ फिरवली आहे. ओबीसी वर्गाने डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे कार्य जाती धर्मापलिकडे जाऊन समजून घेतले असते तर आज देशातील प्रत्येक संविधानीक संस्थेवर ओबिसीचा प्रभाव असता. या देशा मध्ये जाती व्यवस्था बळकट करून माणसाच्या विभाजनाच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक आणि आर्थिक मलई खाणारा वर्ग खुप सक्रिय आहे. हा वर्ग जाती, धर्म व पंथाचा वेळोवेळी विपर्यास करून माणसा माणसा मध्ये दुरावा निर्माण करून स्वतः ची झोळी भरत असतो. आज पर्यंत ज्यांनी माणसाच्या कल्याणासाठी, वैज्ञानिक व तर्कशुद्ध पद्धतीने समाजात जनजागृती केली त्या सर्व मानवतावादी व क्रांतीकारी नायकांना जातीत बंदीस्त करून त्यांचे कार्य मर्यादित करण्याचे काम केले गेले. ज्यांनी महापुरुषांना डोक्यावर घेतले त्यांनी सुद्धां महापुरुषांना जातीच्या बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करताना दिसत नाहीत. डॉ बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने ओबीसी चे जनक व कल्याणाचे शिल्पकार आहेत. भारतीय संविधानात ओबीसी शब्द व ओबीसी साठी कलम ३४० समाविष्ट करण्यासाठी तत्कालीन ओबीसी नेत्यांनीच विरोध करावा या पेक्षा जास्त शोकांतिका कोणती असु शकते. तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर ना ओबीसी शब्द संविधानातुन बाहेर काढत ना ३४० कलम हटवतात. याच दुरदृष्टी व कल्याणाकारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे ओबीसी बांधवांना आज सोन्याचे दिवस आले आहेत. आजही काही



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
(समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००)

वेळी ओबिसींना डावलून तेथे प्रस्थांपितांना संधी दिली जाते हा धुर्तपणा सुरू असला तरीही आजपर्यंत च्या ओबिसींच्या विकासाला डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे कार्यच कारणीभुत आहे हे मान्य करावे लागेल. बऱ्याच ओबीसी लोकांना डॉ बाबासाहेब आंबेडकर हिंदु विरोधी वाटतात. परंतु जेव्हा आपण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार समजून घेतो, डॉ बाबासाहेब आंबेडकर या व्यक्तीमत्वाला जेव्हा जाणून घेतो तेव्हा असेच लक्षात येते कि डॉ बाबासाहेब आंबेडकर हे कोणत्याही जाती धर्माच्या विरोधात नसुन ते सत्य, विज्ञान, समता, न्याय व बंधुता यांच्या सोबत होते व कार्य रुपाने आजही आहेत. आता सत्य, विज्ञान, समता, न्याय व बंधुता यावर काम करणे जर धर्म विरोधी वाटत असेल तर प्रत्येकाने आपली बुद्धी तपासने आवश्यक आहे. दुसरी कडे काही ओबीसी वर्ग डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर केले म्हणून थोडे दुर गेले असे सांगण्याचा निरागस प्रयत्न करतात. परंतु एकाद्याचे काम केवळ कोणत्या धर्मात आहे म्हणून स्विकारत असाल तर हि मानसिक गुलामी व द्वेष भावना आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरीती व रुढीपरंपरे मध्ये बदल करून माणव कल्याणाचे तत्व धर्मात असायला पाहिजे असे अनेक वेळा नमुद केले. परंतु धर्माच्या अनिष्ट चालीरीती व विषमता, जातीभेद दुर करायला कोणीही तयार होत नव्हते. तसेच अंधविश्वास आणि पाखंडाचा संबंध धर्माशी जोडून लोकांना अंधविश्वासात ढकलण्याचे काम केले जात होते. बरं अंधविश्वास, समता, बंधुता, न्याय व विज्ञान यावर फक्त बाबासाहेब आंबेडकर हेच बोलले का? तर नाही अनेक संत, महापुरुष डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अगोदरही वरील मुद्यांवर बोलले आणि विषेश म्हणजे त्यांनी धर्मांतर सुद्धां केले नाही तरीही ओबिसी बांधवांनी त्यांचे विचार आजही स्विकारलेले नाहीत अथवा त्यांना घरामध्ये आणले नाही. महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज, संत रविदास महाराज, संत चोखामेळा असे अनेक नावे आहेत जे मानव कल्याणासाठी लढले परंतु मनुवादी मानसिकता असलेल्या लोकांनी त्यांना अजूनही घरात घेतले नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समजून घेऊन त्यांच्या विचाराने मार्गक्रमण केले तर प्रत्येक भारतीयांचे कल्याण होते. फक्त माणसाचा समता, बंधुता, न्याय व मानवी स्वातंत्र्यावर विश्वास पाहिजे. शेतकरी प्रश्न असतील, विद्यार्थी प्रश्न असतील, महिला प्रश्न व हक्क अधिकार असतील यावर प्रभावीपणे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी काम केले आहे. परंतु जातीधर्माचा चष्मा आणि डोक्यात विषमतेची घाण असलेल्या लोकांना जगातील सर्वात महान व्यक्ती कसा कळेल. मौल्यवान वस्तुची किंमत होण्यासाठी स्वतः कडे सुद्धां एखादा मौल्यवान गुण असावा लागतो. डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेतांना आपल्या कडे शिक्षण, विज्ञान, तर्कशुद्धता व प्रचंड बुद्धीमत्ता आवश्यक असते. ज्या ज्या ओबिसींना डॉ बाबासाहेब आंबेडकर कळाले त्यांच्या जिवनाचे सोनं झाले. परंतु ओबिसी सह सर्वच जन मानसाचे कल्याण करणाऱ्यांना, मानवाला जागृत करणाऱ्यांना कधीच आपले मानत नाहीत, ज्यांनी हक्क अधिकार व मानवी स्वातंत्र्य बहाल केले त्यांच्या उपकाराची जाणीव लोकांना नाही. परंतु जे जाती धर्माच्या नावाखाली लाचार, गुलाम आणि भिकारी बनवतात त्यांच्या लोक पाया पडतात. आणि जे महापुरुष हातात लेखणी देऊन, जिवनात ज्ञानाचा सुर्य देऊ सर्व सामान्य जनतेला अधिकारी बनवतात अशा महापुरुषांच्या समोर नतमस्तक व्हायला लाज वाटत असेल तर ही नैतिक बेईमानी आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे देशातील प्रत्येक मानसाच्या कल्याणाचे काम करून हजारो वर्षांपासून शिक्षण, हक्क, अधिकार, व वेगवेगळ्या सत्तांपासुन दुर ठेवले होते ते सर्व काही फुकटात देतात. तरीही आजही त्याची जाणीव नाही म्हणून आजही गुलामीचे व लाचारीचे जिवन जगावे लागत आहे. ज्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर, त्यांचे कार्य व त्यांनी दिलेले हक्क अधिकार याची जाणीव आहे तेच लोक स्वाभिमानी बनून आपल्या पिढ्यांचे कल्याण करत आहेत. बाकीचे लोक धर्माच्या व जातीच्या नावाखाली राज्यकर्त्यांच्या भल्यासाठी हातात दगड घेऊन दंगली पेटवून धुर्त लोकांच्या राजकीय कल्याणाकरीता स्वतःचे आयुष्य उध्वस्त करत आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक मानवाला जागृत करून देशाप्रती आपली भावना ही एकच असली पाहिजे, आपण जातीधर्मा पेक्षा जास्त देशाला महत्त्व दिले पाहिजे म्हणून प्रत्येक भारतीय नागरिकांवर नैतिक संस्कार घालतात व डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वतः म्हणतात मी प्रथम आणि अंतिमतः भारतीय आहे. यावरून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे देशा प्रती, देशातील जनतेप्रती किती मोठे कार्य असेल याची जाणीव होते. संविधाना पुर्वी व देशा मध्ये ओबीसी सह इतरही समुहांकडे आर्थिक व शैक्षणिक कमाई काहीच नव्हती. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण देशच सर्वसामान्य माणसाच्या नावावर करून, सर्वच जाती धर्मातील व श्रीमंत- गरीब लोकांना समान करून सामाजिक क्रांती केली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखा मानव उद्धारक, बुद्धिमान, उच्च शिक्षीत, नितीवान व निस्वार्थी महापुरुष दुसरा होणे शक्य नाही. याच व्यक्तीकडे बघून स्वतः चे आयुष्य जरी बदलले आणि प्रत्येकांच्या मनात मी भारतीय असल्याची भावना जरी रुजवल्या गेली तरी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन होईल व आपण जागृत व नितीवान नागरिक आहोत याची प्रचिती येईल...

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला, विचारांना, बुद्धीमत्ता व राष्ट्रप्रेमाला विनम्र अभिवादन.

# आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : अक्कलकोट तालुका शिवसेना व तालुका महिला आघाडी, युवा सेनेच्या वतीने आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचे सत्कार करण्यात आले. तालुका प्रमुख संजय देशमुख जिल्हा उपप्रमुख सैपन पटेल विधानसभा संघटक प्रा सुर्यकांत कडबगावंकर यांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीचे उमेदवार सचिन दादा कल्याणशेट्टी यांना भरघोस मतांनी विजयी करण्यासाठी युवा सेना तालुका प्रमुख समीर शेख व महिला आघाडी तालुका प्रमुख सौ वर्षा चव्हाण व त्यांच्या कार्यकर्त्यांनी नियोजनबध्द प्रचार करुन महायुतीचे उमेदवार सचिन दादा यांना भरघोस मतांनी विजयी केले.

शनिवारी भाजपा कार्यालय येथे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचा सत्कार शिवसेनेच्या वतीने सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आले यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर यादवाड शिवसेना विधानसभा संघटक प्रा सुर्यकांत कडबगांवकर युवासेना तालुका प्रमुख समीर शेख.मा.कामगार सेना तालुका प्रमुख शिवानंद कोळी महिला आघाडी जिल्हा उपप्रमुख सौ सुलोचना कडबगावकर तालुका प्रमुख सौ वर्षा चव्हाण तालुका उपप्रमुख सौ ताराबाई कुंभार तालुका उपप्रमुख सौ इंदुमती वाघमारे यावेळी आ सचिन दादा कल्याणशेट्टी यांचा सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिले.

# प्रवीण बागड़े यांना उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपुर /प्रतिनीधी



महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर तर्फे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वर्ग १ व २ अधिकाऱ्यांमधुन उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यापीठाच्या संचालक, विस्तार शिक्षण विभागातील कार्यरत वरिष्ठश्रेणी लघुलेखक/स्विय सहायक श्री प्रविण मोरेश्वर बागडे यांना २०२३-२४ या वर्षाकरीता 'उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. २५ व्या विद्यापीठ वर्धापन दिनी विद्यापीठ मुख्यालयी आयोजित सोहळयात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

सदर पुरस्कार विद्यापीठ मुख्यालय अधिनस्त घटक महाविद्यालये/प्रक्षेत्रे/संस्थेमधील २०२३-२४ या वर्षाकरीता वर्ग १ व २ संवर्गातून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या एक शिक्षकेत्तर अधिकारी, तसेच वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कर्मचाऱ्यांकरीता प्रत्येकी एक पुरस्कार देऊन सम्मानित करण्यात येणार आहे. सदर पुरस्काराचे उद्दिष्ट म्हणजे विद्यापीठ तसेच विद्यापीठ अधिनस्त घटक महाविद्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कार्याची नोंद घेणे, कर्मचाऱ्यांमध्ये प्रामाणिकपणा, सेवा तत्परता व विद्यापीठाप्रती आत्मीयता वाढविणे, कर्मचाऱ्यांमध्ये उत्कृष्ट आणि असाधारण योगदान देण्याची भावना जोपासने व त्यांची कार्यक्षमता वाढविणे असे आहे. श्री. बागड़े यांनी नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील दूधबर्डी येथे २० हेक्टर शासकिय जमीन संपादित करून विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्रासाठी शासन निर्णय काढण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. याआधी त्यांना २०१७-१८ करिता उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. ते महाराष्ट्रातील अनेक मंत्र्यांकडे स्वीय सहाय्यक म्हणुन कार्यरत होते. शासन आणि प्रशासनाच्या अनुभवासोबतच त्यांना समाजसेवा आणि साहित्याचीही आवड आहे. त्यांनी कोविड अंतर्गत अनेक रुग्णांची सेवा सुध्दा केली असुन त्यांचे महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रांमध्ये विविध विषयांवर २५० वर लेख तसेच १०० वर मुलाखती/स्तंभ सुध्दा प्रकाशित झाले आहेत. या पुरस्काराबद्दल त्यांचे अनेक स्तरावरून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

# भिवंडीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात कार्यकर्त्यांचा प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/भिवंडी : तालुक्यातील ग्रामीण भागातील पूर्णा,लाखीवली जिल्हा परिषद गटातील कार्यकर्त्यांनी शनिवारी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. भिवंडी लोकसभा मतदार संघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. या पक्षप्रवेश सोहळ्याने राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची ताकद तालुक्यात निश्चितच वाढली असून आगामी काळात जिल्हा परिषद निवडणुकीत जिल्हा परिषदेवर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा झेंडा फडकवणार असल्याची इच्छा यावेळी खासदार बाळ्या मामा यांनी व्यक्त केली आहे.



कार्यकर्ता प्रवेश सोहळ्यात भिवंडी पंचायत समितीच्या गणेशपुरी गटातील माजी सदस्या मालती मधुकर वाघे,मोहिली गाव गट सदस्य बद्रीनाथ विष्णू पाटील,पूर्णा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व नाभिक सेना महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अनिल खंडागले,माजी उपसरपंच सुरेश पाटील यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी यावेळी शरद पवार गटात जाहीर प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष गणेश गुळवी, राष्ट्रवादीचे युवा नेते सुमित म्हात्रे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागणसुर केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद कन्नड मुली शाळेचे घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : जिल्हा परिषद सोलापूर व पंचायत समिती शिक्षण विभाग अक्कलकोट यांच्या मार्फत आयोजित नागणसुर केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत नागणसुर कन्नड मुली शाळेने मोठा गट मुली कबड्डी व लंगडी स्पर्धेत घवघवीत यश संपादन करून बीटस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. दर वर्षी प्रमाणे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध स्पर्धा आयोजन केले जाते.शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा एच.जी.प्रचंडे प्रशालेच्या मैदानावर केंद्र प्रमुख शिवाजी शिंदे यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले.या वेळी केंद्रातील सर्व शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक बंधू भगिनी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत नागणसुर कन्नड मुली शाळेने खालील विविध क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन करून बीटस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाले आहे. मोठागट लंगडी - (प्रथम



क्रमांक), मोठा गट कबड्डी (प्रथम क्रमांक), मोठा गट खोखो (द्वितीय क्रमांक) वयक्तिक खेळ : बुद्धिबळ - दिपाली विठ्ठल बिरादार (प्रथम क्रमांक), ऐश्वर्या मल्लप्पा गांगोंडा (द्वितीय क्रमांक), १०० मीटर धावणे ज्योती हंद्राळ (द्वितीय क्रमांक) लहान गट - लंगडी (द्वितीय क्रमांक), लहान गट कबड्डी, ( द्वितीय क्रमांक), लहान गट खो खो (द्वितीय क्रमांक) वयक्तिक खेळ - १०० मीटर धावणे - सविता शिवप्पा खिलारी (तृतीय क्रमांक), २०० मीटर धावणे सविता शिवप्पा खिलारी (द्वितीय क्रमांक), बुद्धिबळ प्रतीक्षा शरणप्पा मणुरे (द्वितीय क्रमांक) वरील सर्व यशस्वी विद्यार्थिनींना क्रीडा शिक्षक शरणप्पा फुलारी,राजशेखर खानापुरे,राजकुमार नरूणे,लक्ष्मीकांत तळवार,मुख्याध्यापक श्रीशैल दोडमनी,शांता तोळणूरे,राजशेखर कुर्ले यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांना गट शिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे,विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी,केंद्रप्रमुख शिवाजी शिंदे,केंद्रीय मुख्याध्यापक विद्याधर गुरव,बसवराज स्वामी,बसवराज खिलारी,गावाचे सरपंच, उपसरपंच सर्व सदस्य,गाव तंटामुक्त समितीचे अध्यक्ष तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गंगाधर भोसगी,उपाध्यक्ष बसवराज तेग्गीनकेरी,शिक्षणतज्ञ गुरुबाई प्रचंडे,ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी ओंकार गंगोंडा,हणमंत प्रचंडे सर्व सदस्य तसेच ग्रामस्थ पालक अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिले.

# महायुतीचे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पाठीमागे होता आरपीआयचा अविनाश म्हणून झालं मोठ्या मताधिक्याने विरोधकाचे सर्वनाश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

२०१९ पासून २०२४ या कालावधीमध्ये अक्कलकोट तालुक्यात होऊन गेलेल्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाला मित्रपक्ष म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट याची खंबीर साथ मिळाली असून रिपाईचे तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी सुरुवातीपासूनच प्रामाणिकपणे सचिनदादा कल्याणशेट्टी यांना पूर्ण ताकतीशी साथ दिली आहे यंदाही त्याची प्रचिती विधानसभेच्या निवडणुकीमध्ये दिसून आले २०१९ मध्ये देखील अविनाश मडीखांबे यांनी संपूर्ण तालुका पिंजून काढून दलित व ईतर समाजाची मते भारतीय जनता पक्षाकडे वळवलेली होती.

या निवडणुकीत दलित अल्पसंख्यांक मते विभागली जातील अशी शक्यता वर्तवली जात होती परंतु अविनाश मडीखांबे यांनी २०१९ प्रमाणे यावेळीही संपूर्ण तालुका आपल्या संपूर्ण टीमचा सहकार्याने पिंजून काढून मोक्याच्या ठिकाणी आपल्या खास शैलीच्या रोखठोक भाषणाने मतदारांची



मने जिंकून आंबेडकरी जनतेचे मते महायुतीच्या पारड्यात टाकली.दांडगा जनसंपर्क आणि युवा नेतृत्व यामुळे नेहमी महायुतीला अविनाश यांनी खंबीर अशी साथ दिलेली आहे काँग्रेस किंवा वंचित कडे दलित नेते वळतील असे अनेकांनी तर्क लावलेले असताना सुद्धा अविनाश मडीखांबे यांच्या मतदारसंघातील संपर्कामुळे आणि प्रचारामुळे आंबेडकरी मते महायुतीला पडून सचिन दादा कल्याण शेट्टी यांच्या मताधिक्य वाढण्यास मदत झाली.दुधनी भागात रिपाईचे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,तडवळ भागात सिद्धार्थ गायकवाड,आप्पा भालेराव,विजयकुमार पोतेनवरु,जेऊर जिल्हा परिषद गट अंबादास गायकवाड, पानमंगरूळ राजु बोरगाव,दिलीप माळी सलगर भागात राजू भगळे,शहरात शहराध्यक्ष अजय मुकणार,ता उपाध्यक्ष प्रकाश गडगडे,चंद्रकांत गायकवाड, शिरवळ शाखाध्यक्ष तथा ग्रामपंचात सदस्य उत्तम गायकवाड,दत्तामामा मडिखांबे,भारत सोनकांबळे,रोमित मडीखांबे,सुनिल मनिकडे,मलकण्णा सोनकांबळे,शिवानंद सोनकांबळे,नितेश मडीखांबे शुभम मडीखांबे विजयकुमार बाळशंकर,सुरेश गायकवाड, सुरेश सोनकांबळे अजय मडिखांबे,गणेश बनसोडे,बसवराज निम्मे,राजु ना गप्पा कांबळे,जयकुमार सोनकांबळे,शिवा कांबळे सांगवीचे भिमा गायकवाड,वालचंद सोनकांबळे,शिवानंद सोनकांबळे, दयानंद सोनकांबळे,सिद्धाराम मडिखांबे,लखन वेसकर, शुभम मडिखांबे,अंबादास बनसोडे, वीरपक्ष माने,विशाल सोनकांबळे, कल्याणी घाटगे, रिपाईचे अभ्यासू पश्चिम महाराष्ट्र नेते राहुल रूही यांनी तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण तालुक्यामध्ये प्रचारात आघाडी घेऊन महायुतीला निवडून आणण्यात मोलाची भूमिका बजावली अक्कलकोट तालुक्यातील रिपाईच्या सर्व शाखांध्यक्षांनी यावेळी मताधिक्य आपापल्या गावांमध्ये कामे केल्याचे दिसून आले.२०१९ पासून २०२४ पर्यंत रिपब्लिकन पक्षाने दिलेल्या प्रामाणिक आणि निर्णायक साथीमुळे महायुतीला सर्व निवडणुकांमध्ये यश आल्याचे दिसून येते भविष्यामध्ये महायुतीचा महत्वाचा घटक पक्ष म्हणून रिपाईच्या किंबहुना अविनाश मडीखांबे यांच्या रूपाने सचिनदादा कल्याणशेट्टी काय न्याय देतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
रविवार दि. १ डिसेंबर २०२४ 

## थोडक्यात...

### अज्ञात चोरट्याने कार्यक्रमातून पर्स पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : कार्यक्रमात खुर्चीवर ठेवलेली हॅन्डबॅग पर्सवर नजर ठेवून अज्ञात चोरट्याने पळवली. या घटनेची हकीकत अशी की, शोभना दत्तात्रय श्रीराम (वय-४६,रा.गांधीनगर ,दक्षिण सदर बझार सोलापूर) या २८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास एमआयडीसी येथे असलेल्या दुसा इव्हेंट्स हॉल येथे कार्यक्रमाला गेलेल्या असताना अज्ञात चोरट्याने त्याची खुर्चीवर ठेवलेले हॅन्डबॅग पळवली.त्यात सोन्याचे दागिने, मोबाईल्स होते. अज्ञात चोरट्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

### दारू पिण्यास पैसे न दिल्याने लाटण्याने मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) : दारू पिण्यास पैसे दिले नाही म्हणून चिडून जाऊन नवऱ्याने बायकोस लाटण्याने तोंडावर मारून जखमी केले.तसलीम शहानवाज शेख (वय-२८,रा. कब्रस्तान जवळ,कुमठे गाव,सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पती शहानवाज शेख यांनी २८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी दारू पिण्यासाठी पैसे मागितले.पैसे देण्यास नकार दिल्याने चिडून जाऊन शिवीगाळ करत घरातील चपाती करावयाच्या लाटण्याने तोंडावर ,हातावर, पायावर मारून जखमी केले.याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात पतीच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलास हावालदार बहिर्जे हे करित आहे.

# मुख्याधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे न. प. कर्मचारी मारत आहेत दांडी

## नागरिकांना बसतोय फटका; जिल्हाधिकाऱ्यांच्या कारवाईकडे लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जिल्हा/प्रतिनिधी, वसमत : वसमत नगर परिषद येथे मुख्याधिकारी यांची कर्मचाऱ्यांवर वचक नसल्याने कार्यालयीन वेळेत कुठल्याच टेबलवरचे कर्मचारी उप-स्थित राहत नसल्याचा प्रकार तरुण भारतच्या निदर्शनास आला आहे. दिनांक २८ नोव्हेंबर रोजी वसमत येथील नगरपरिषद येथे चार वाजल्यापासूनच कर्मचारी आपल्या केबिनला कुलूप लावून गेले असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे या सर्व प्रकाराला जबाबदार मुख्य अधिकारी असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

थंडीचे दिवस असल्यामुळे आपण डाऊन करणारे कर्मचारी हे चार वाजल्यापासूनच गावाकडे जाण्याच्या वाहनाच्या प्रतीक्षेत असल्याने कार्यालयीन वेळ संपण्यापूर्वीच कार्यालय सोडण्याचे पहावयास मिळत आहे याचा फटका मात्र नागरिकांना नक्कीच बसत आहे. शासनामार्फत शासकीय काम ात गुणवत्ता वाढवावे म्हणून विविध उपाय योजना राबविण्यात येत आहे परंतु वसमत नगर परिषद येथील कर्मचारी हे दांडी







मारून आपल्या सोयीनुसार ये जा करत असल्याचे पहावयास मिळत आहे याप्रसंगी संबंधित मुख्याधिकारी यांना तरुण भारत वृत्तपत्राच्या प्रतिनिधींनी फोन द्वारे संपर्क साधली असता ते म्हणाले की मी आत्ताच ऑफिस मधून निघालो बाकीचे कर्मचारी हे कुठेतरी गेले असतील असे सांगून आ-पली जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केले असल्याचा पहावयास मिळत आहे परंतु तरुण भारत च्या प्रतिनिधींनी हा सर्व प्रकार तरुण भारत कॅमेरात कैद केला आहे आता याकडे जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी यांनी कारवाईचा बडगा उचलतात का? हे पाहणे देखील तितकेच गरजेचे आहे.

एकेकाळी बायोमेट्रिक मशीन असल्याम ुळे कर्मचाऱ्यांना वेळेवर येणे वेळेवर हजेरी लावणे बंधनकारक होते परंतु कोरोना काळापासून ह्या मशिनी धुळ खात पडल्याने जुन्या परंपरे प्रमाणे हजेरीपटावर हाजरी ला-वणे सुरू झाल्याने कर्मचारी हे लगा लावून हजेरी तर लावत नाही ना? यात देखील शंका निर्माण होत आहे. आता जिल्हा अधिकाऱ्यांनी सर्व शासकीय कार्यालयात बायोमेट्रिक मशीन तात्काळ सुरू करण्याचे आदेशित करावे जेणेकरून दांडी बहाद्दर कर्मचाऱ्यावर याची वचक बसून कार्यालयीन कामकाज योग्य वेळी पूर्ण होईल हे मात्र तितकेच खरे.

# इस्रोला भेट देणारी जिल्ह्यातील पहिली शाळा डुबेरेची

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी, सोमनाथ गिरी : मविप्र समाज संस्थेच्या जनता माध्य. आणि उच्च माध्य. विद्यालयातील १८ विद्यार्थी व मुख्याध्यापक श्री आर.व्ही वाजे, उपक्रमशील विज्ञान शिक्षक पी.आर. करपे, श्रीम. बी.जी. निखाडे बेंगलोरच्या इस्रो संस्थेला भेट दिली.




गेल्या ३२ वर्षापासून इस्रो मध्ये विविध मोहिमेवर काम करणाऱ्या शास्त्रज्ञा श्रीम. आर. उमावती यांनी विद्यार्थ्यांना इस्रोमध्ये सॅटॅलाइट कशाप्रकारे तयार करतात व सोडतात. तसेच चांद्रयान -१, चांद्रयान-२, चांद्रयान-३ याविषयी सविस्तर माहिती दिली. चांद्रयान- ३ चे चंद्रावर उतरण्याची एक व्हिडिओ क्लिप दाखविली. तसेच त्यामध्ये कोणकोणत्या प्रकारची उपकरणे वापरली आहेत आणि ती कशासाठी वापरलीत त्यांचे उपयोग सांगितले. तसेच गगनयान हे अवकाश यात्रींना लवकरच अवकाशामध्ये घेऊन जाणार असल्याची माहिती दिली. गगनयान यशस्वी झाल्यानंतर भारत काही दिवसातच अवकाशामध्ये आपले स्वतःचे अवकाश स्थानक तयार करणार आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी शास्त्रज्ञांना अनेक प्रश्न विचारले. त्यामध्ये प्रकाशाच्या वेगाने प्रवास करणारे एखाद्या यान तयार करता येईल काय? अणूमध्ये असलेल्या कक्षेतील अंतर किती असते? गगनयान यशस्वी करण्यासाठी किती शास्त्रज्ञ यामध्ये काम करतात? इस्रो या संस्थेत काम करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या परीक्षा द्याव्या लागतात? असे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांनी विचारले.

त्यानंतर ज्या ठिकाणी सॅटेलाइट व चांद्रयान यांची बांधणी केली जाते त्या ठिकाणी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना निरीक्षण करण्याची संधी मिळाली. वरील सर्व बाबी पाहता विद्यार्थी आणि विज्ञान शिक्षक अतिशय मग्न होऊन गेले होते. असे वाटत होते की इस्रो हा परिसर पाहतच राहावा.

इस्रो या संस्थेला भेट देणारी नाशिक जिल्ह्यातील ही पहिली शाळा असल्याने हा उपक्रम राबविण्यासाठी विद्यालयाचा माजी विद्यार्थी श्री संदेश वाजे यांनी वैज्ञानिक सहल प्रायोजित केली होती.

यासाठी मविप्र संस्थेचे सरचिटणीस ड. नितीन ठाकरे, संचालक श्री कृष्णाजी भगत यांच्या प्रेरणेने व संस्थेचे शिक्षण अधिकारी डॉ. भास्कर ढोके यांच्या म ार्गदर्शनाने ही वैज्ञानिक सहल यशस्वी झाली. यासाठी शालेय समितीचे अध्यक्ष नारायण वाजे, विठ्ठल वामने, भगवान वाजे, शंकर वामने, अरुण वांरूगसे, विजय वाजे यांनी प्रयत्न केले.

# सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सचिनदादा कल्याणशेट्टी यांना मंत्री करावे : प्रा.राहुल रुही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विकास करायचा असल्यास सर्वांना सोबत घेऊन जाणारे व आपल्या धडाकेबाज विकास कामांसाठी परिचित असणारे अक्कलकोट तालुक्याचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना केंद्रातील महायुतीच्या नेत्यांनी व देवेंद्र फडणवीस साहेबांनी त्यांची कार्य कुशलता लक्षात घेऊन राज्याच्या मंत्रिमंडळात समाविष्ट करून त्यांना कॅबिनेट मंत्री करावे अशी मागणी अक्कलकोट पुणे रहिवासी संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा पश्चिम महाराष्ट्र रिपाई नेते प्रा. राहुल रूही यांनी केंद्र नेतृत्व व देवेंद्र फडणवीस ,चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केलेले आहे पश्चिम महाराष्ट्रातील सर्वाधिक निधी आणणारे आम दार म्हणून सचिन दादा यांची ओळख असून अक्कलकोट तालुक्याच्या सर्वांगीण विकास साठी तसेच सोलापूर जिल्ह्या-चा स्मार्ट सिटी चा अधिक गतीने विकास होण्यासाठी पालकमंत्री म्हणून सचिन कल्याण





शेट्टी हे सक्षमपणे भूमिका बजावू शकतात त्यामुळे सचिन दादा कल्याणशेट्टी यांना मंत्रिमंडळामध्ये समाविष्ट करून काम करणाऱ्या आमदाराला संधी द्यावी, जिल्ह्याच्या लोकांची, कार्यकर्त्यांची हीच भावना असून निश्चितच सचिनदादा मंत्री पदाला न्याय देतील असे मागणे प्राध्यापक राहुल रूही यांनी पत्राद्वारे ईमेलद्वारे वरिष्ठांकडे केलेली आहे.

# संविधान जागृती अभियान कार्यक्रम साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डोणगांव/प्रतिनिधी : २६ नोव्हेंबर ला भारतीय संविधान दिनानिमित्त संविधान बदल जागृती अभियान डॉ बाबासाहेब आंबेडकर वाटीका डोणगांव येथे राबवण्यात आले, संविधानाची प्रस्तावना चे सामुहिक वाचन सोहम संदिप मोरे आणि अक्षरा संघपाल खोडके यांनी वाचन केले. सिध्दार्थ गरपाल ह्या विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेतील कार्याचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विष्णू तेलगोटे यांनी संविधान इतिहास आणि नागरिकांना मुलभूत अधिकार ह्याबद्दल माहिती देली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय संविधान सभेवर कश्याप्रकारे निवड झाल्याबद्दल याबद्दल डॉ. किरण चव्हाण यांनी सामान्य जनतेने माहिती देली. आणि मुलभूत अधिकार चा वापर करण्यासोबतच आपले देशाबद्दल चे कर्तव्य पार पाडले पाहिजे असे सांगितले. विनोद सदावर्ते यांना देशा-तील विविध योजना संविधानातून घेण्यात आल्या आणि संविधानात महिला, दिव्यागं व्यक्तींना, दुर्बल घटकांना आदिवासी साठी कोणत्या उपाययोजना करण्यात आला ह्या बद्दल माहिती देली. मानसाला मानूस म्हणून जगण्याचा अधिकार हा संविधानाने देवा आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी प्राचार्य मोरे सर यांनी केले. संविधानाने माणसाला प्रमाणे पशू आणि पक्षाची चे संरक्षण करण्याची तरतूद कशी केली आहे हे सांगितले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे मसुदा समितीवरील कार्य आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले.संविधान बदल जागृती असेल तर आपले आणि संविधानाचे रक्षण करू शकतो. असे भिमराव मोरे यांनी सांगितले.कार्यक्रम ात मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि महिला उपस्थित होत्या. सूत्रसंचालन भिमराव मोरे यांनी तर समारोप यश विनोद खोडके यांनी केले. निलेश सदावर्ते, अमोल बोरकर, अविनाश खोडके, अमर बोरकर, आशिष चव्हाण, अतिश रोठे, तुषार खोडके, सचिन रोठे, प्रदिप मोरे सागर बोरकर, नकुल रोठे, योगेश खोडके. भारत बोरकर सुरेंद्र खोडके यांचे सहकार्य लाभले.

**गुरु म्हणजे शिष्य निर्माण करणारी फॅक्टरी नाही : गुरुबाबा महाराज**

**गुरुबाबा यांचे प्रतिपादन**

# सद्‌गुरु गुरुबाबा महाराज व सद्‌गुरु रामकृष्ण महाराज वार्षिक उत्सवाची श्रीक्षेत्र निलंगा बारवं येथे गोपाळकाल्याने सांगता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निलंगा/प्रतिनिधी : सद्‌गुरु गुरुबाबा महाराज आणि रामकृष्ण महाराज यांच्या वार्षिक उत्सवाची आज निलंगा शहरातून सद्‌गुरूंच्या पालखीची नगर प्रदक्षिणा होऊन नंतर श्रीक्षेत्र बारवं येथे दहीहंडी गोपाळकाला फोडून उत्स-ाहात सांगता झाली.

२५ नोव्हेंबर पासून श्रीक्षेत्र निलंगा बारवं यथे श्री गुरुबाबा महाराज व रामकृष्ण महाराज यांच्या उत्सवास स्थापनेने आरंभ होऊन आज शुक्रवार दिनांक २९ रोजी गोपाळकाल्याने हजारो भाविकांच्या उपस्थितीत सांगता झाली. यावेळी ज्ञानोबा तुकारामाच्या, सद्गुरूंच्या आणि विठ्ठलाच्या नाम गजराने बारवं क्षेत्र परिसर दुम दुमून गेला होता.

पिठाधीपती सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या अधिपत्यात आणि सद्‌गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनात आणि ह भ प श्री श्रीरंग महाराज व ह भ प ज्ञानराज महाराज औसेकर यांच्या सहभागात मोठ्या भक्ती भावाने संपन्न झाला.

या उत्सवात ह भ प वीरनाथ महाराज शेडजी निटूरकर, ह भ प श्री ज्ञानराज महाराज औसेकर, ह भ प श्री श्रीरंग महाराज औसेकर. सद्‌गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर व सद्‌गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांची कीर्तन सेवा गुरुबाबा रामकृष्ण महाराज यांच्या समाधी सम ोर संपन्न झाली.

निलंग्याच्या बारवं क्षेत्री दरवर्षी होणाऱ्या

> **किर्तनात आपण श्रद्धा ठेवावी पण ती विचारपूर्वक ठेवावी, आधी आपले विचार शुद्ध आचरण शुद्ध आणि नित्यनेमात राहण्याची मानसिक तयारी ठेवली पाहिजे.**

उत्सवात निलंगा व पंचक्रोशीतील नित्यनेमाचे सदभक्त शिष्य आपली सेवा विरनाथ महाराज चरित्र ग्रंथाचे पारायण कडाक्याच्या थंडीचे दिवस असताना मोठ्या उत्साहाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून करतात. ह भ प गुरुभक श्री मनोज महाराज लंबोटीकर हे पारायणाची व्यासपीठ सांभाळतात.

या उत्सवात जवळपास ३० ते ४० गावा-तून ज्ञानोबा तुकाराम, सद्‌गुरु वीरनाथ मल्लनाथ महाराज आणि रामकृष्ण गुरुबाबा महाराज यांच्या नावाचा जयघोष करीत आपापल्या गा-वातून निलंग्यात उत्सव स्थळी येतात. हजारो





टाळकरी, भाविक भक्त, कीर्तन, चक्रीभजन, प्रवचन दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतात, सलग पाच दिवस निलंग्यात या उत्सवामुळे भक्ती उत्साहाचे वातावरण निर्माण होते.

**गुरु म्हणजे शिष्य निर्माण करणारी फॅक्टरी नाही : गुरुबाबा महाराज**

सद्‌गुरुंच्या समाधीस्थळी तीर्थक्षेत्री निलंगा किंवा औसा क्षेत्रात भाविक मोठा श्रद्धेने येतात आणि त्यांना ताबडतोब उपदेश घेण्याची घाई असते परंतु गुरु म्हणजे काही शिष्य निर्माण करणारी फॅक्टरी नाही, त्यासाठी आधी गळ्यात माळ, पंढरीची वारी, ज्ञानेश्वरीचे पारायण, गाथा वाचन आणि एकादशी या वृतामध्ये आपल्या जीवनाला आणून नंतरच समजून, पारखून, निर्धार करून गुरु करून घ्यावा व गुरुकडून गुरुमंत्र उपदेश घ्यावा, असे प्रतिपादन नाथ संस्थानचे पीठाधिपती सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांनी निलंगा येथे गोपाळकाल्याच्या पूर्वी कीर्तनात केला आहे.

किर्तनात आपण श्रद्धा ठेवावी पण ती विचारपूर्वक ठेवावी, आधी आपले विचार शुद्ध आचरण शुद्ध आणि नित्यनेमात राहण्याची मानसिक तयारी ठेवली पाहिजे.

गुरुंनी सांगितलेला उपदेश व शिकवण जीवनभर आचरणात आणण्याची तयारी घेऊन उपदेश घ्यावा, उपदेशानंतर मनुष्य जिवाच्या जीवनामध्ये परिवर्तन घडलेच पाहिजे, असे श्री गुरुबाबा महाराज म्हणाले.

कीर्तनानंतर गुरुबाबांनी श्री रामकृष्ण गुरुबाबा महाराज यांच्या समाधी संमुख चक्रीभजनाची सेवा करून, नंतर पालखीसह निलंगा नगर प्रदक्षिणेसाठी दिंडी निघाली, शहरातील मुख्य रस्त्यावरून भावी भक्त महिला दिंडीचे व गुरुबाबांचे स्वागत करण्यासाठी व दर्शनासाठी दूतर्फा गर्दी करून होते.नंतर दिंडी बारवात येऊन, खेळ खेळूया, फुगडी, हमाम भुलई व काल्याचा अभंग होऊन दहीहंडी काला फुटला. यावेळी हजारो भक्तांनी सद्गुरूंचे स्मरण व दर्शन घेऊन काल्याचा प्रसाद घेतला. गोपाळकाल्याच्या वाळवंटी खेळ सद्‌गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या निर्देशात व श्री ज्ञानराज महाराज व श्री श्रीरंग महाराज यांनी काल्याचे कार्यक्रमात विविध खेळ भाविक भक्तांनी सामूहिकपणे केले.

## थोडक्यात...

### रिक्षा पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) रेल्वे लाईन फॉरेस्ट येथून अज्ञात चोरट्याने रिक्षा क्रमांक एमएच.१३.सीटी.३०४७ ही कशाच्या तरी साह्याने चालू करून मुद्दामून लबाडीने चोरून नेल्याची फिर्याद मच्छिंद्र यशवंत खलाटे (वय-५७,रा.रेल्वे लाईन फॉरेस्ट,कुमार चौक) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना १४ नोव्हेंबर रोजी रेल्वे लाईन फॉरेस्ट येथे घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल फुटाणे हे करीत आहे.

### महावितरण रोहित्रा मधील ऑइल पळविले

सोलापूर (प्रतिनिधी) मजरेवाडी येथील महावितरण कंपनीच्या मालकीच्या रोहित्रांमधून ऑइल चोरून नेल्याची २७ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर दरम्यान कस्तुरी पार्क येथे घटना घडली. याबाबत सदानंद भगवान रणझुंजारे (वय-४५) यांनी एम आयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात फिर्याद दिली आहे. पुढील तपास पोलीस हावालदार पाटील हे करित आहे.

### महिलेनं मोबाईल काढून घेतला

सोलापूर (प्रतिनिधी) राँग साईड दुचाकीवर आलेल्या महिलेनं एका पादचारी व्यक्तीस ठोकरलं.यानंतर महिलेसह तिघांनी त्या व्यक्तीला खाली पाडून बेदम मारहाण करून त्याच्याकडील महागडा आयफोन जबरदस्तीनं काढून घेतला.ही घटना चार हुतात्मा चौकालगत हि.ने. वाचनालय गेटसमोर शुक्रवारी सायंकाळी ६ च्या सुमारास घडली. विकास बाळासाहेब उदाने (वय-३६,रा.निंबर्गी,ता. दक्षिण सोलापूर) हे हि.ने. वाचनालय जवळून शुक्रवारी सायंकाळी पायी चालत निघाले असताना समोरून राँग साईड स्कुटीवरून एक महिला वेगानं आली. स्कुटीची धडक विकास उदाने यांना बसली ते खाली जमिनीवर पडले.यानंतर वाद झाला तेव्हा या महिलेनं तसेच तिच्याबरोबर असलेल्या दोघां जणांनी विकास यांना बेदम मारहाण केली. दगडानं तोंडावर मारून जखमी केलं. ते रक्तबंबाळ अवस्थेत असताना या महिलेसह या दोघांनी त्यांच्या खिशातील आयफोन हा काढून घेतला. असे उदाने यांनी फिर्यादीत म्हटले आहे. शिवाय या तिघांनी यांना सोडू नका, आपण कोण आहोत हे त्याला कळू द्या असं म्हणत दमबाजी केल्याचही म्हटलं आहे. फौजदार चावडी पोलीसात अज्ञात महिलेसह दोघाजणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी विकास उदाने यांच्यावर रूग्णालयात उपचार करण्यात आले. त्यांच्या तोंडावर दाताला मार लागला आहे. पुढील तपास सपोनि. जाधव हे करित आहे.

# चारी मुंड्या चीत झालेले कलंकित तोंड झाकण्यासाठी ईव्हीएमवर आरोप

## इंदापुरात माजी खासदार अमर साबळेंनी साधला विरोधकांवर निशाणा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापुर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व्हावेत, याकरिता माजी खासदार अमर साबळे यांनी शनिवारी इंदापूर तालुक्यातील नीरा नरसिंहपुर येथे फडणवीस यांचे कुलदैवत लक्ष्मी नरसिंहाचे दर्शन घेऊन अभिषेक केला.साबळे म्हणाले की,महाराष्ट्रात अभूतपूर्व ऐतिहासिक यश माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राप्त केले आहे.

महाराष्ट्रातील महायुतीच्या विजयाचे शिल्पकार देवेंद्र फडणवीस आहेत.म्हणून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी ते विराजमान व्हावेत. त्यांच्या हातून महाराष्ट्र सुजलाम-सुफलाम व्हावा,आणि त्यांना दीर्घायुष्य लाभावे.यासाठी लक्ष्मी नरसिंहाचे दर्शन घेऊन अभिषेक केला.आणि महाराष्ट्र सुखी आणि समृद्ध व्हावा हे साकडे घातले.

यावेळी साबळे यांनी ईव्हीएम भाष्य केले,ईव्हीएम विषयी जी चर्चा होत आहे, ती जनतेचा सुर नाही.जे चारीमुंड्या चित झाले आहेत ते विरोधक स्वतःची अब्रू झाकण्यासाठी ईव्हीएम संदर्भात आरोप करत आहेत.

झारखंड मध्ये त्यांचे सरकार आले तेव्हा ते ईव्हीएम मध्ये घोटाळा झाला असे म्हटले नाहीत. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीला थोडसं जास्त यश प्राप्त झाले. त्यावेळी ईव्हीएम मध्ये घोटाळा आहे असे ते म्हटले नाहीत.परंतू,जेव्हा-जेव्हा विरोधकांचं तोंड कलंकित होतं ते कलंकित तोंड झाकण्यासाठी ईव्हीएम वर आरोप करायचा ही त्यांची पद्धत आहे.जनतेने निर्विवाद बहुमत महायुतीला दिलेले आहे. असे माजी खा.साबळे यांनी सांगितले..

तसेच महाराष्ट्र मजबूत झाला तर देश मजबूत होईल. देश परम वैभवाला जावा.हेच स्वप्न देशातील १४० कोटी लोक घेऊन जगत आहेत.हे स्वप्न साकार करायचे असेल तर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस असले पाहिजेत अशी आमची भावना आहे.असे माजी खासदार अमर साबळे यांनी सांगितले. यावेळी राज्य सरकार स्थापन होण्याबाबत देखील साबळे यांनी महत्त्वपूर्ण वक्तव्य केले.यावेळी साबळे म्हणाले की,सरकार स्थापन करताना नेत्यांशी सुसंवाद, मंत्रिमंडळातील खात्यांचे वाटप,आगामी धोरण या सर्वांवर विचारविनिमय करून निर्णय घ्यावा लागतो.विचारांनी निर्णय घ्यायला वेळ लागतो.अविचाराने निर्णय घेणे कधीही होऊ शकते. आम्हाला विचारपूर्वक काम करायचे आहे

सरकार स्थापन व्हायला वेळ लागतोय.मात्र ५ डिसेंबर रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर दुपारी एक वाजता देवेंद्र फडणवीस सरकारचा शपथविधी होणार आहे. अशी माहिती साबळे यांनी दिली.

मात्र राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाराज असल्याच्या चर्चा अशा अफवा विरोधक पसरवत असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा जो निर्णय घेतील तो मला मान्य आहे. असे शिंदे यांनी स्वतः पत्रकार परिषद घेऊन सांगितले आहे. त्यांनी जाहीर केल्यानंतर ते नाराज आहेत,असे म्हणणे चुकीचे होईल. एकनाथ शिंदे नाराज असल्याची निव्वळ अफवा आहे. असे साबळे म्हणाले.यावेळी भाजपा पुणे जिल्हा महामंत्री आकाश कांबळे,ओबीसी मोर्चाचे पुणे जिल्हाध्यक्ष गजानन वाकसे,ज्येष्ठ नेते माऊली चवरे, माऊली थोरात,विशाल वाळुंजकर,राजकुमार जठार, रमेश खारतोडे,संतोष कांबळे,निरा नरसिंहपुर देवस्थान ट्रस्टचे विजयकुमार वानकर, मा.सरपंच चंद्रकांत सरवदे, गौतम सरवदे,मा. सरपंच संतोष मोरे,तानाजी वायाळ, विकास मोहिते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीच्या ८ विद्यार्थ्यांची 'एव्हर्टोजेन फार्मा प्रा. लि.' मध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे निवड




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टीटयूट संचलीत कॉलेज ऑफ फार्मसी तथा बी. फार्मसी महाविद्यालयातील ०८ विद्यार्थ्यांची हैदराबाद येथील 'एव्हर्टोजेन फार्मा प्रायव्हेट लिमिटेड' या औषध निर्मिती क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीत कॅम्पस इंटरव्यूव्हमधून निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी दिली.

हैदराबाद येथील 'एव्हर्टोजेन फार्मा प्रायव्हेट लिमिटेड' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीचे व्यवस्थापक राजेश किणगे, एच.आर. नवीनकुमार जोगी व त्यांच्या निवड समितीने स्वेरीच्या स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात दि.१५ नोव्हेंबर २०२४ रोजी येऊन घेतलेल्या इंटरव्यूव्हमधून डी. फार्मसी व बी. फार्मसी च्या एकूण ०८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. गुणात्मक अभ्यासाबरोबरच कमालीची शिस्त, आदरयुक्त संस्कृती व उत्कृष्ठ शिक्षण पध्दती यामुळे निवड समिती अत्यंत प्रभावीत झाली. निवड समितीच्या अंतिम प्रकियेतून फार्मसीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणारे प्रतिक शिवराज खराडे, मिनाज रफिक तांबोळी, दिव्या महादेव बोराडे, प्राची सुकुमार अवचर, सुश्मिता चंद्रकांत कांबळे, प्रतिका राजेंद्र सुरवसे, सुशांत शंकर मुसमुसे आणि ऋतुजा उमेश पंके या ०८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाला आलेल्या भरघोस यशानंतर पालकांच्या मागणीनुसार २००६ साली फार्मसी महाविद्यालयाची स्थापना झाली. अभियांत्रिकीच्या पाऊलांवर पाऊल ठेवून फार्मसी मध्ये देखील यशस्वी वाटचाल सुरु आहे.

प्रत्येक वर्षी वार्षिक परीक्षेमध्ये उकृष्ठ निकाल, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट होण्याच्या संख्येत लक्षणीय वाढ आदी बाबी विद्यार्थ्यांच्या करिअरला पोषक अशा आहेत. कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी सांगितले की, 'आमचा विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राईव्ह आयोजित करण्याचा उद्देश, त्यांना उत्तम करिअर संधी उपलब्ध करून देणे आहे. 'एव्हर्टोजन' फार्मासारख्या प्रतिष्ठित कंपनीने आमच्या विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाव्यात यासाठी आमच्या विनंतीचा स्वीकार करून कॅम्पस ड्राईव्ह घेण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद मिळाला.' या कॅम्पस ड्राईव्ह मधील यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ. मिथुन मणियार व फार्मसीचे ट्रेनिग अँड प्लेसमेंट इन्चार्ज प्रा. कोमल परचंडे व टी.पी.ओ. समन्वयक प्रा.प्रदीप जाधव यांच्या नेतृत्वाखाली इतर प्राध्यापकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना प्लेसमेंटमध्ये देखील यश मिळत आहे. यामुळे विद्यार्थ्यांबरोबरच पालकांमध्येही आनंदाचे वातावरण पसरले आहे. संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी. रोंगे, अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी व पालकांनी कंपनीत निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## महायुतीचे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी यांच्या विजयामध्ये रिपाइंची मोलाची साथ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी हे पन्नास हजार इतक्या मताधिक्याने दणदणीत विजय मिळविला असून या विजयामध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाची अनमोल साथ मिळाली असल्याचे मत तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी केले आहे. सन २०१९ ते २०२४ या पंचवार्षिक आणि २०२४ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मित्रपक्ष म्हणून खांद्याला खांदा लावून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाने खंबीर दिली आहे. रिपाईंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्यायराज्यमंत्री रामदास आठवले व प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या आदेशानुसार अक्कलकोट तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी सुरुवातीपासूनच प्रामाणिकपणे सचिनदादा कल्याणशेट्टी यांना पूर्ण तन मन धनाने ताकतनिशी साथ दिली आहे. यंदाही त्याची प्रचिती विधानसभेच्या निवडणुकीमध्ये दिसून आले २०१९ मध्ये देखील अविनाश मडीखांबे यांनी संपूर्ण तालुका पिंजून काढून दलित व इतर समाजाची मते भारतीय जनता पक्षाकडे वळवली होती. या विधानसभा निवडणुकीत दलित, अल्पसंख्यांक मते विभागली जातील अशी शक्यता वर्तवली जात होती. परंतु अविनाश मडीखांबे यांनी २०१९ प्रमाणे यावेळीही संपूर्ण तालुका आपल्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या सहकार्याने पिंजून काढून मोक्याच्या ठिकाणी आपल्या खास आक्रमक शैलीत रोखठोक भाषणाने मतदारांची मने जिंकून आंबेडकरी जनतेचे मते महायुतीच्या पारड्यात टाकली.दांडगा जनसंपर्क आणि युवा नेतृत्व यामुळे नेहमी महायुतीला अविनाश मडिखांबे यांनी खंबीर अशी साथ दिलेली आहे. काँग्रेस किंवा वंचित कडे दलित नेते वळतील असे अनेकांनी तर्क लावलेले असताना सुद्धा अविनाश मडीखांबे यांच्या मतदारसंघातील संपर्कामुळे आणि प्रचारामुळे आंबेडकरी मते महायुतीला पडून सचिन दादा कल्याण शेट्टी यांच्या मताधिक्य वाढण्यास मदत झाली. दुधनी विभागात भागात रिपाईंचे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी, संतोष जन्ना, मैंदिमीय्या जिडगी, तडवळ विभागात सिद्धार्थ गायकवाड, उमेश शिवशरण राजू बोरगावकर, राजू गायकवाड, बाबासाहेब गायकवाड, दिलीप माळी, उत्तम वाघमारे, बापू वाघमारे, करण शिंदे, जेऊर विभागात युवक अध्यक्ष आप्पा भालेराव,अंबादास गायकवाड, श्रावण भालेराव, सचिन बनसोडे, मैंदर्गी शहरात युवक जिल्हा सरचिटणीस विजयकुमार पोतेनवरु,शाणप्पा मनिकडे,सुनिल मनिकडे,किरण दुबेकर, भिमशा आरेनवरु, हणमंत शिंगे, शिवचलप्पा किरगल, शिवनिंगप्पा आरेनवरु, बसवराज पोतेनवरु, सलगर विभागात राजू भगळे,बसवराज निम्मे, जयभिम भगळे, मलकण्णा सोनकांबळे, मल्लू नडगेरी, दादा चव्हाण, अक्कलकोट शहरात शहराध्यक्ष अजय मुकणार, युवा नेते राहुल रुही, सरचिटणीस शुभम मडिखांबे, उपाध्यक्ष सुरेश सोनकांबळे, रोमीत मडिखांबे,वरपक्ष माने, नितेश मडिखांबे, प्रणेश बनसोडे, सुरेश गायकवाड, अंबादास शिंगे, ताजुद्दीन शेख, दत्ता मामा मडिखांबे, भारत सोनकांबळे, विजयकुमार बाळशंकर, सिध्दाराम मडिखांबे, विजय मडिखांबे, नागेश मडिखांबे,प्रकाश मडिखांबे, लखन वेसकर, बंटी मडिखांबे, अजय मडिखांबे, आकाश मडिखांबे नागणसुर विभागात तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे,चंद्रकांत गायकवाड,यमनप्पा शिंदे, बाबू निरगुडी, राजू कांबळे, शरणू गायछोडे, बसवराज गजधाने, सलगर विभागात जयकुमार सोनकांबळे, विकास टोणगे, परमेश्वर ऐवळे, सायबण्णा गायकवाड, शिवानंद दोडमनी, रमेश बनसोडे, सिध्दू पैलवान, रमेश दोडमनी, बाबू कांबळे, वागदरी विभागात शिरवळ शाखाध्यक्ष तथा ग्रामपंचात सदस्य उत्तम गायकवाड, भिमा गायकवाड, वालचंद सोनकांबळे, शिवानंद सोनकांबळे, दयानंद सोनकांबळे, विलास गायकवाड, विजय साखरे, संदीप सोनकांबळे, संदीप इंगळे, विशाल इंगळे, भिम इंगळे,शांतकुमार इंगळे, उत्तम इंगळे, किशोर गायगवळी, चप्पळगाव विभागात राजकुमार गवळी, संतोष बाळशंकर, मनोज सोनकांबळे, शेखर सोनकांबळे,मंजू बनसोडे, आशिष उकरंडे, राजकुमार बनसोडे यांनी आपापल्या भागात हिरीरीने सहभागी होऊन महायुतीचे उमेदवार यांना विजयी करण्याचे आवाहन केले. तसेच रिपाईंचे अभ्यासू पश्चिम महाराष्ट्र युवा नेते राहुल रूही आणि तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण तालुक्यामध्ये प्रचारात आघाडी घेऊन महायुतीला निवडून आणण्यात मोलाची भूमिका बजावली. अक्कलकोट तालुक्यातील रिपाईच्या सर्व शाखा अध्यक्षांनीआपापल्या गावांमध्ये मताधिक्य मिळवून देण्यासाठी कामे केल्याचे दिसून आले. २०१९ पासून २०२४ पर्यंत रिपब्लिकन पक्षाने दिलेल्या प्रामाणिक आणि निर्णायक साथीमुळे महायुतीला सर्व निवडणुकांमध्ये यश आल्याचे दिसून येते.

**पत्रकारांच्या मागण्यांना नवनिर्वाचित आमदार डॉ. किरण लहामटे यांचा पाठिंबा**

**आमदार डॉ. किरण लहामटे**

# पत्रकारांच्या प्रश्नांसाठी विधानसभेत आवाज उठवणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोले/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या विविध मागण्यांचे निवेदन नुकतेच नवनिर्वाचित आमदार डॉ. किरण लहामटे यांना अकोले येथे सादर करण्यात आले. विधानसभेच्या निवडणुकीनंतर आमदार डॉ. लहामटे यांनी दैनिक समर्थ गांवकरी कार्यालयाला भेट दिली. या भेटीच्या वेळी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी त्यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व पेढे देऊन स्वागत केले आणि पत्रकारांच्या समस्यांबाबतचे निवेदन त्यांना सादर केले.

पत्रकारांच्या मागण्या आणि महामंडळ स्थापना: पत्रकार संघाने सादर केलेल्या निवेदनात पत्रकारांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापणा लवकरात लवकर करण्याची मागणी केली ती पूर्ण झाली वृत्तपत्र विक्रेत्यांचे महामंडळ झाले तरी अजून २२ मागण्या प्रलंबित असून त्या तातडीने सभागृहात आवाज उठवावा या महामंडळाद्वारे पत्रकारांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचा आग्रह आहे. यामध्ये ग्रामीण आणि शहरी भागातील पत्रकारांच्या सुरक्षेच्या उपाययोजना, आर्थिक सहकार्य, विमा संरक्षण, तसेच त्यांच्या सामाजिक सुरक्षा योजनांचा समावेश आहे.

यावेळी पत्रकार संवाद यात्रेचे माहिती पुस्तकही डॉ. लहामटे यांना सुपूर्त करण्यात आले. पत्रकार संघाच्या या मागण्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत डॉ. लहामटे म्हणाले, पत्रकार समाजाचा महत्त्वाचा घटक आहेत. ते समाजाला योग्य माहिती देण्याचे कार्य करत असतात. त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलली पाहिजेत. यावेळी डॉक्टर लहाने यांनी राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्याशी मोबाईल द्वारे संपर्क करून राज्यातील सर्व प्रश्न पत्रकारांचे सभागृहात मांडणार असा विश्वास दिला

ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी विशेष योजना:

या संदर्भात बोलताना आमदार डॉ. किरण लहामटे यांनी पत्रकारांच्या समस्यांवर विधानसभेत आवाज उठवण्याचा आश्वासक शब्द दिला.

राज्यातील पत्रकारांच्या प्रश्नांसाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन आणि विधानसभेत पत्रकारांचे हक्क, सुरक्षा आणि कल्याणाच्या मुद्द्यांवर चर्चा घडवून आणण्याचा निर्धार केला आहे, असे लहामटे म्हणाले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर यशस्वीपणे राबवलेल्या अभियानाचे त्यांनी कौतुक केले. डॉ. लहामटे यांनी पत्रकारांच्या मागण्यांना पूर्ण पाठिंबा दर्शविताना, विशेषत: ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी नवीन योजना तयार करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी लाडका पत्रकार नावाची योजना राबविण्याचा प्रस्ताव विधानसभेत मांडण्याची ग्वाही दिली. याशिवाय, प्रत्येक ग्रामपंचायत आणि शाळेत वर्तमानपत्र खरेदीसाठी दरमहा दहा हजार रुपयांची तरतूद करण्याची मागणीही त्यांनी मान्य केली.

पत्रकार सुरक्षेसाठी प्रयत्न: डॉ. विश्वासराव आरोटे यांनी पत्रकारांच्या सुरक्षेबाबतच्या अडचणी मांडल्या. त्यांनी पत्रकारांसाठी आर्थिक सहाय्य, जीवन आणि आरोग्य विमा, तसेच पेन्शन योजना लागू करण्याची आवश्यकता स्पष्ट केली. डॉ. लहामटे यांनी या विषयांवर लक्ष केंद्रित करत विधानसभेत पत्रकारांच्या समस्यांसाठी आवाज उठवण्याचे आश्वासन दिले.

प्रतिनिधींचे समाधान: या भेटीवेळी अकोले ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार मैड, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सचिव हरिभाऊ फापाळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अक्षय आभाळे, तसेच रेडे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रशांत बंदावणे एलआयसीचे सल्लागार जीवन पाडेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पत्रकार संघाच्या प्रतिनिधींनी आमदार डॉ. लहामटे यांच्या पाठिंब्याबद्दल समाधान व्यक्त केले.

पत्रकारांच्या हितासाठी पुढील वाटचाल: या चर्चेत पत्रकारांच्यासामाजिक सुरक्षा आणि त्यांच्या समस्यांवर सखोल चर्चा झाली. पत्रकार संघाच्या मागण्यांना राजकीय स्तरावर पाठिंबा मिळाल्याने भविष्यात पत्रकारांच्या कल्याणासाठी ठोस पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

अकोले येथे झालेल्या या महत्वपूर्ण चर्चेमुळे पत्रकारांच्या समस्या ऐरणीवर आल्या असून, त्यावर उपाययोजना करण्यासाठी राजकीय स्तरावर हालचाली होणार आहेत. आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या पाठिंब्यामुळे पत्रकारांच्या मागण्यांना शासनाकडून लवकरात लवकर प्रतिसाद मिळेल, अशी आशा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने व्यक्त केली आहे.